आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
७ जुलै २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर मिसिंग लिंकमध्ये निर्माण झालेल्या समस्येची कारणे विधान परिषदेत मांडली जातील असं राज्य सरकारचं आश्वासन

- सरकारने विधानसभेत  दिलेल्या आश्वासनांबाबतची श्वेतपत्रिका हे अधिवेशन संपेपर्यंत काढावी,असे अध्यक्षांचे आदेश

- मुंबई आणि उपनगरात पावसाची विश्रांती, जनजीवन पूर्वपदावर

**<u>आणि</u>**

- अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात ३८ जणांना फाशी तर इतर ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा देण्याचा विशेष न्यायालयाचा निर्णय गुजरात उच्च न्यायालयात कायम

**<><><><><>**

मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर मिसिंग लिंकमध्ये निर्माण झालेल्या समस्येची कारणं सरकार शोधत आहे. ही कारणे सभागृहात मांडली जातील असं निवेदन मंत्री शंभूराज देसाई यांनी विधान परिषदेत दिलं. हे सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. निसर्गाच्या अवकृपेने नेहमीपेक्षा चौपट पाऊस झाल्यानं ही समस्या निर्माण झाल्याचं ते म्हणाले. देहू आणि आळंदीहून निघणाऱ्या पालख्यांमधल्या वारकऱ्यांना पावसात सरकार काही मदत करणार का यासंदर्भात निवेदन करण्याचे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले. अंबादास दानवे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.

मुंबई गोवा महामार्गावर इंदापूर आणि माणगाव बाह्य वळण वगळता इतर कामं ऑगस्ट २०२६ अखेर पूर्ण करण्याचं नियोजन आहे असं सरकारनं आज विधान परिषदेत लेखी उत्तरात सांगितलं. भूसंपादन, वनजमीन मंजुरी, कोरोना महामारी, पश्चिम आशियातलं युद्ध या कारणांमुळे कामं पूर्ण व्हायला विलंब झाला. या महामार्गावर काही ठिकाणी पथकर वसुली सुरू झाल्याचं सरकारनं म्हटलं आहे.

कर्नाटकसारख्या राज्यात जात पडताळणी करणे गरजेचे नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सुधारणा करता येईल का याचा विचार करावा, त्यासाठी ॲडव्होकेट जनरलच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात सुधारित अर्ज दाखल करावा अशी मागणी सदस्य प्रसाद लाड यांनी केली. त्यावर कायदेशीर बाबी तपासून घेऊ असं आश्वासन मंत्री माधुरी मिसाळ यांनी सदनात दिलं. नगरपालिका, नगरपरिषदांमध्ये नवनिर्वाचित सदस्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणखी ६ महिने मुदत वाढ देण्यासंदर्भातल्या विधेयकावरच्या चर्चेत त्या बोलत होत्या.

राज्यातल्या धर्मादाय रुग्णालयांचा शहरी भागासाठी एक आणि ग्रामीण भागासाठी एक डॅशबोर्ड बनवला जाईल. या डॅशबोर्डवर त्या ठिकाणच्या सर्व रिक्त खाटांची माहिती प्रदर्शित केली जाईल असं आश्वासन सरकारने विधान परिषदेत दिलं. या रुग्णालयांमध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले आरोग्य योजनेच्या अंतर्गत या रुग्णालयात उपचार केले जातील, असं मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात सध्या सुमारे चार ते साडे चार लाख बेकायदा बाईक टॅक्सी रस्त्यावर धावत असून आरटीओ वेळोवेळी त्यांच्यावर कारवाई करत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यात फक्त इलेक्ट्रॉनिक बाईक्सना परवानगी देण्यात आली होती, पण पेट्रोल बाईक्स सर्रास रस्त्यावर उतरल्या, त्यामुळे त्यांच्यावर बंदी घालायचा निर्णय सरकारने घेतला. पण देशभर सगळीकडे एकाच ॲपद्वारे या कंपन्या काम करत असल्यामुळे ही बंदी मागे घ्यावी लागली, असं ते म्हणाले. येत्या १ ऑगस्टपासून अशा सर्वच प्रकारच्या वाहनांचा परवाना मिळवताना अधिवासाचं प्रमाणपत्र सक्तीचं केलं जाणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

पुणे शहरात पॉक्सो अंतर्गत ३ हजार ५५८ खटले प्रलंबित असून यापैकी ६ पॉक्सो विशेष न्यायालयांमध्ये २ हजार ८०३ खटले प्रलंबित आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. १३८ विशेष जलदगती न्यायालयं स्थापन करायला मान्यता दिली आहे, मात्र न्यायाधीशांच्या अभावी यापैकी फक्त ५८ न्यायालयं कार्यान्वित आहेत. या न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देणं हे न्यायव्यवस्थेचं काम आहे, त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाकडे सतत पाठपुरावा सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं. न्यायव्यवस्थेत कनिष्ठ स्तरावर अनेक पदं रिक्त असून यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याचा मुद्दा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उपस्थित केला आणि यावर वेगाने काम करावं, अशी सूचना सरकारला केली. ते केलं जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

सरकारने आत्तापर्यंत सभागृहात दिलेली आश्वासनं आणि अधिक माहिती पटलावर ठेवण्याच्या परिस्थितीबाबतची श्वेतपत्रिका हे अधिवेशन

संपेपर्यंत काढावी, असा आदेश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज दिले. १७ डिसेंबर २०१५ रोजीच्या उत्तरित प्रश्नाची अधिक माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांनी सभागृहासमोर मांडली. त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी आक्षेप घेतला. हा मुद्दा अतिशय गंभीर असल्याचं मत नार्वेकर यांनी नोंदवलं आणि अशा सर्व प्रलंबित बाबींचा अनुशेष पुढच्या अधिवेशनापर्यंत भरून काढावा, असंही त्यांनी सरकारला सांगितलं.

<><><><><>

मुंबई आणि उपनगरात आज सकाळपासून वातावरण ढगाळ आहे, परंतु पावसानं उसंत घेतल्यानं काल विस्कळीत झालेलं जनजीवन पूर्वपदावर येत आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांच्या पाणलोट क्षेत्रात जलसाठ्याची पातळी वाढत आहे. गेल्या सहा दिवसात शहर आणि उपनगरात सुमारे अकराशे वृक्ष उन्मळून पडल्याची माहिती पालिकेच्या सूत्रांनी दिली. हवामान विभागाने आज पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. या पार्श्वभूमीवर आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा सतर्क आहे. अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन प्रशासनाने केलं आहे.

महामार्गांवरच्या दरडी हटवून वाहतूक सुरळीत करण्यात येत आहे. मुंबई गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्याच्या हद्दीतली वाहतूक पूर्ववत झाल्याचं महामार्ग पोलिसांनी कळवलं आहे.

<><><><><>

**नाशिक** जिल्ह्यात काल रात्रभर नाशिक , त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि सुरगाणा तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. खबरदारीचा उपाय म्हणून देवळा तालुक्यातल्या भावडबारी घाट वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

कसारा घाटात आज दरड कोसळल्यानं काही काळासाठी वाहतुकीवर परिणाम झाला. नांदूरमध्यमेश्वर प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. काल रात्री त्र्यंबकेश्वर येथील मेटघर किल्ल्यावरच्या १०० जणांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे. मुसळधार पावसामुळे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठानं आज होणाऱ्या विद्यापीठाच्या सगळ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. सुधारित वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर केलं जाईल.

**रत्नागिरी** जिल्ह्याच्या खेड तालुक्यातल्या दहिवली गावाच्या शेलारवाडीत काल रात्री भूस्खलन झालं. त्यामुळे एका घराचा काही भाग कोसळून ३जण ढिगाऱ्याखाली अडकले होते. त्यापैकी एकाला बाहेर काढण्यात आलं असून बेपत्ता व्यक्ती जिवंत सापडण्याची शक्यता कमी असल्याचं एनडीआरएफनं सांगितलं आहे. शासनानं मृतांच्या कुटुंबांना ४ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. मंडणगड तालुक्यात म्हाप्रळ - आंबेत पुलाला धडकलेला एक बार्ज काढला असून दुसरा बार्ज काढण्याचं काम सुरु आहे.

**रायगड** जिल्ह्यात गेल्या ६ दिवसांपासून मुसळधार पावसामुळे सतत दरडी कोसळत असल्यानं भोर-महाड रस्ता ३१ ऑगस्टपर्यंत तर आंबेनळी घाट ३१ जुलै पर्यत बंद ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यातल्या अंबा, सावित्री, पाताळगंगा, कुंडलिका, भोगावती, बाळगंगा, उल्हास या नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून १४ गावातल्या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

**सांगली** जिल्ह्यातल्या प्रमुख नद्या आणि बंधाऱ्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.

**पालघर** जिल्ह्याच्या अनेक भागांत मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. संततधार पावसामुळे पश्चिम रेल्वेची वाहतूक सलग दुसऱ्या दिवशी विस्कळीत झाली आहे. पावसामुळे डहाणूतल्या शेणसरी इथं एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. काही ठिकाणी जनावरं वाहून गेली आणि मालमत्तेचंही नुकसान झालं आहे. माहीम-केळवा धरण १०० टक्के भरलं असून, खबरदारीचा उपाय म्हणून अनेक रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

**बुलडाणा** जिल्ह्यात पावसानं उसंत दिल्यानं शेतीच्या कामाला वेग आला आहे. जिल्ह्यात शेतकऱ्यांनी सोयाबीन लागवडीला पसंती दिली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यातल्या २९९ बंधाऱ्यांपैकी ५७ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**ठाणे** जिल्ह्यातल्या भिवंडी तालुक्यात खडवली आणि जू गाव यांना जोडणारा पूल पाण्याखाली गेल्यानं त्यांचा इतर गावांशी संपर्क तुटला आहे.

**जालना, अकोला आणि धाराशिव** जिल्ह्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरु आहे.

**<><><><><>**

वारकऱ्यांनी वार्षिक पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी आळंदीत येणं टाळावं, असं आवाहन श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या विश्वस्तांनी केलं आहे. मुसळधार पावसामुळे राज्यात निर्माण झालेली गंभीर पूरपरिस्थिती लक्षात घेत त्यांनी हे आवाहन केलं. हवामानाची परिस्थिती सुधारल्यानंतर पालखीच्या पुढील मुक्कामी दिंडीत सहभागी व्हावं, असे त्यांनी सुचवलं आहे.

मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला पूर आला असून ती धोक्याच्या पातळीवरून वाहत आहे.

आषाढी वारीतल्या १० मानाच्या पालख्या ज्या मार्गावरून जातात त्या मार्गावर वारकरी आणि भाविकांच्या वाहनांना पथकरातून सूट देण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागानं या बाबतचं पत्रक जारी केलं आहे.

**<><><><>**

अहमदाबाद इथे २००८मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातल्या ३८ दोषींना फाशी तर इतर ११ जणांना जन्मठेप देण्याचा विशेष न्यायालयाचा निर्णय गुजरात उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. न्यायमूर्ती ए. वाय. कोगजे आणि न्यायमूर्ती समीर दवे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या प्रकरणी विशेष न्यायालयाने दिलेल्या शिक्षेविरोधातले सर्व दावे उच्च न्यायालयाने फेटाळून लावले. २६ जुलै २००८ रोजी अहमदाबादमध्ये ७० मिनिटांत २१ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले होते. त्यात ५६ जणांचा मृत्यू झाला होता तर २०० जण जखमी झाले होते. या घातपातात इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेच्या ३८ सदस्यांना २०२२मध्ये विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा तर इतर ११ दोषींना जन्मठेप सुनावली होती.

**//<><><><><>//**